**पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष,**
**गुन्हे शाखा, बृहन्मुंबई यांचे कार्यालय**

---

**-: प्रेस नोट :-** दिनांक - ०३/०६/२०२६

**अंमली पदार्थ विरोधी कक्ष यांची बृहन्मुंबईमध्ये PIT-NDPS अंतर्गत कारवाई दरम्यान ड्रग्ज् तस्करीकरणारा आरोपी नामे तमीजूल हैदर मजहरहूल हैदर रीझवी उर्फ मिसाम, वय ४३ वर्षे, यास १ वर्षे करीता नाशिक रोड मध्यवर्ती कारागृहात स्थानबध्द केलेबाबत.**

अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे कांदीवली युनिट, अं.प.वि.कक्ष, मुंबई यांनी त्यांचेकडील गु.र.क्र. ०८/२०२६, कलम ८ (क) सह २२ (ब) २९ एन.डी.पी.एस.कायदा १९८५ अन्वये दाखल गुन्हयात अंमली पदार्थाची तस्करी करणारी अटक आरोपी सराईत गुन्हेगार , **तमीजूल हैदर मजहरहूल हैदर रीझवी उर्फ मिसाम** वय ४३ वर्षे, रा.ठि.- रूम नं.३६, प्लॉट नं.३ , गेट नं. ५, ओल्ड कलेक्टर कंम्पाउंड , अब्दूल हमीद रोड, होली मदर स्कूलचे मागे, मालवणी मालाड, वेस्ट मुंबई याचेवर अंमली पदार्थाची तस्करीचे एन.डी.पी.एस. कायदयान्वये एकुण ७ गुन्हे दाखल असल्याचे दिसुन आले. तसेच नमुद गुन्हयात मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असुन ते न्यायप्रविष्ठ होते. तसेच सदर ड्रग्ज् तस्करी करणारी आरोपी **तमीजूल हैदर मजहरहूल हैदर रीझवी उर्फ मिसाम**, वय ४३ हा जामीनावर सुटताच परत अंमली पदार्थाचा व्यवसाय करत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे त्याचेविरुदध मा. पोलीस आयुक्त सो. बृहन्मुंबई यांचेवतीने अंमली औषधीद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ विधिनिषीद्ध व्यापार प्रतिबंध अधिनियम १९८८ (PIT NDPS ACT 1988) अन्वये अंमली पदार्थ विरोधी कक्ष, बांद्रा युनिट, गु.शा. मुंबई यांनी स्थानबध्द आदेश जारी होण्याकरीता मा. स्थानबध्द अधिकारी तथा प्रधान सचिव सो (विशेष) गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांस प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

सदरच्या स्थानबध्द प्रस्तावास गृह विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडुन मंजुरी आदेश प्राप्त झाले. त्यानुसार नमुद आरोपीस ताब्यात घेवुन त्याला स्थानबध्द आदेशाची बजावणी करून ०१ वर्ष स्थानबध्दतेकरीता दि. ०२/०६/२०२६ रोजी नाशिक रोड मध्यवर्ती कारागृह, येथे दाखल करण्यात आले आहे.

अंमली पदार्थ विरोधी कक्षाने सन २०२६ मध्ये अंमली औषधीद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ विधिनिषीद्ध व्यापार प्रतिबंध अधिनियम १९८८ (PIT NDPS ACT 1988) अन्वये सन २०२६ मध्ये जामीनावर सुटल्यानंतर वांरवार गुन्हे करणा-या ०९ आरोपींना स्थानबध्द केले असून ही स्थानबध्दतेची १० वी कारवाई आहे.

- **तमीजूल हैदर मजहरहूल हैदर रीझवी उर्फ मिसाम,वय ४३ वर्षे याचेवर** अंमली पदार्थ व्यवसायात सक्रीय असल्याचे अंमली पदार्थ विरोधी कायदयाअंतर्गत दाखल गुन्हे अभिलेख:-

१) मालवणी पोलीस ठाणे वि.स्था. गु.क्र. ११७/२०२०,कलम ८(क) सह २० एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५
२) मालवणी पोलीस ठाणे वि.स्था. गु.क्र. १२७/२०२०, कलम ८(क) सह २२ (ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट
३) मालवणी पोलीस ठाणे वि.स्था. गु.क्र. १८०/२०२१, कलम ८(क) सह २२ (ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट
४) मालवणी पोलीस ठाणे वि.स्था. गु.क्र. ४८/२०२२, कलम ८(क) सह २२ (ब), २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट
५) मालवणी पोलीस ठाणे वि.स्था. गु.क्र. १७९/२०२३, कलम ८(क) सह २२ (ब), २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट
६) मालवणी पोलीस ठाणे वि.स्था. गु.क्र. १६०३/२०२५, कलम ८(क) सह २२ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५
७)अ.प.वि.क.कांदीवली युनिट गु.र.क.०८/२०२६ कलम ८(क) सह २२ (ब) एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५

सदरची यशस्वी कामगिरी ही मा. श्री. देवेन भारती, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा.श्री.अनिल कुंभारे, पोलीस सह आयुक्त(गुन्हे), मा.श्री कृष्णकांत उपाध्याय, अपर पोलीस आयुक्त(गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली

मा.श्रीमती पौर्णीमा चौगुले - श्रींगी, पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, श्री.नवनाथ ढवळे, पोलीस उप आयुक्त गुन्हे प्रकटीकरण , गुन्हे शाखा (अतिरीक्त कार्यभार अंमली पदार्थ विरोधी कक्ष)गुन्हे शाखा, मुंबई, व मा.श्री.सुधीर हिरडेकर, सहाय्यक पोलीस आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई अं.प.वि.कक्ष, गुन्हे शाखा, कांदीवली युनिटचे व.पो.नि. शशीकांत जगदाळे, यांचे नेतृत्वाखाली सहा पोलीस निरीक्षक विजय नाईक , तसेच गुन्हे प्रतिबंधक शाखेचे व.पो.नि. सुवर्णा अडसुळे, पो.नि. सरीता गावडे, स.पो. नि. रविंद्र पाटील, पो.उ.नि. संदिप शिंदे, पो.उ.नि. सतिश निंबाळकर यांनी केली आहे.

------oooo------